आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१९ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या नागरिकांना दिलेली आश्वासनं पूर्ण करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार रवींद्र वायकर यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली

- कांदा निर्यातीवरचं शुल्क रद्द करण्याची राज्य सरकारची केंद्राकडे मागणी

- अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने केलेल्या व्याज दरकपातीमुळे देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण

**आणि**

- आकाशवाणीतर्फे नवी मुंबईत प्रमुख भारतीय भाषांमधल्या कवितांचे संमेलन

**<><><><><>**

राज्यातल्या, शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकांना दिलेली आश्वासनं पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. ते म्हणाले…

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस ( १६ सेकंद)**

लाडकी बहीण योजनेतल्या अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकण्याचे सुतोवाचही त्यांनी केलं. शेतकऱ्यांकडून विजेचे बिल घेणार नाही, असं ते म्हणाले. ९ लाख कृषीपंप आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मागेल त्याला सौरपंप आम्ही देणार असून ३ महिन्यात जोडणी देऊ, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

राज्यात वसुलीबाजांना थारा दिला नाही तर राज्याच्या प्रगतीचा वेग दुप्पट होईल. अशा वसुलीबाजांवर आता कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचंही फडनवीस यांनी सांगितलं.

राज्यात १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प सुरू केले आहेत. आतापर्यंत ६६७ मेगावॅट वीज कार्यान्वित झाली. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणार आहे. थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून, १ जुलै २०२२ पासून सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात आली आहे. यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार असल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा युती सरकारच्या काळात दलितांवर सातत्यानं अत्याचार होत असून त्यांना न्याय मिळत नाही, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. विधानसभेत परभणी आणि बीड जिल्ह्यातल्या घटनांवरच्या चर्चेत ते बोलत होते. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करुन निरपराध लोकांवर लाठीचार्ज केला, त्यांना लाठीचार्जचे आदेश कुणी दिले? सोमनाथ सुर्यवंशी हा पोलीस लाठीचार्जचा व्हीडिओ शूट करत असताना पोलिसांनी त्याला अटक केली आणि पोलीस कोठडीत बेदम मारहाण केली, त्यात त्याचा मृत्यू झाला. पण सरकारनं अद्याप एकाही पोलिसावर कारवाई का केली नाही, असा प्रश्न पटोले यांनी केला.

**<><><><><>**

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आज जाहीर केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिंदे यांना सभापतींच्या खुर्चीवर आसनस्थ केलं. शिंदे यांची सभागृहाने

एकमतानं निवड केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

**<><><><>**

महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. गेल्या अडीच वर्षात राज्याच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन महाराष्ट्र समृद्ध करण्याचं आहे. त्यासाठी आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एकाही पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाही, असा शब्द त्यांनी सर्व महिलांना दिला.

यावेळी त्यांनी राज्याच्या आणि विदर्भाच्या विकासाकरता केलेल्या कामांचा आढावा घेतला. सध्या राज्यात १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामं सुरू आहेत. राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी सात ते आठ तासांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये असं आमचे नियोजन असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भाजपाच्या सुमारे ५० कार्यकर्त्यांनी आज मुंबईत काँग्रेस कार्यालयावर हल्ला केला, असा आरोप मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी केला. हल्लेखोरांनी खुर्च्या फेकल्या, पोस्टर्स फाडली तसंच कार्यालयात मोडतोड केली, त्यांना काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रतिकार केला, असं त्यांनी म्हटलं आहे.

काँग्रेस याबाबत कायदेशीर कारवाई करणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी लक्ष घालून ताबडतोब कठोर कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**होल्ड - वड्डेट्टीवार (११ सेकंद)**

**<><><><>**

गेल्या लोकसभा निवडणुकीत वायव्य मुंबई मतदारसंघातले शिवसेना नेते रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला दिलेलं आव्हान मुंबई उच्च न्यायालयानं आज फेटाळून लावलं. मतमोजणीवेळी तथाकथित वादग्रस्त मतं वायकर यांना कशी मिळाली, हे सिद्ध करायला प्रतिस्पर्धी उमेदवार अमोल कीर्तीकर अपयशी ठरले आहेत, त्यामुळे कीर्तीकर यांच्या याचिकेवर सुनावणी घेता येणार नाही, असं स्पष्ट करत न्यायालयानं ही याचिका फेटाळली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेले २० टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून केली आहे. नाशिकसह राज्यातल्या शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा तसंच कांद्याला खर्चावर आधारीत चांगला दर मिळावा यासाठी कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क रद्द करणं आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पत्रात म्हटलं आहे.

कांद्यावरचं निर्यातशुल्क रद्द करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची मागणी आमदार दादा भुसे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. निर्यात शुल्कामुळे कांद्याला अपेक्षित दर मिळत नसून

शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडे शिफारस करून कांद्यावरचे निर्यात शुल्क रद्द करून कांदा उत्पादकांना दिलासा द्यावा, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने केलेल्या दरकपातीचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ९६४ अंकांची घसरण झाली आणि तो ७९ हजार २१८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४७ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ९५१ अंकांवर बंद झाला. फेडरल रिझर्व्हने व्याजदरांबाबत घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे जागतिक पातळीवरच्या विक्रीचा परिणाम भारतीय बाजारपेठांवर झाला. विशेषतः बँकिंग आणि रिअल इस्टेट या सारख्या क्षेत्रांना याचा मोठा फटका बसला आहे. तत्पूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापारातली मंदी आणि वाढती व्यापारी तूट यांचा फटका भारतीय शेअर बाजाराला बसत होता. त्यामुळे एखादा अपवाद वगळता गेले पाच ते सहा दिवस भारतीय शेअर बाजारांमध्ये घसरण कायम राहिली.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या वतीनं प्रमुख भारतीय भाषांमधल्या कवितांचे कवी संमेलन आज नवी मुंबईत वाशी इथं होत आहे. मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक करुणाशंकर उपाध्याय सर्वभाषा कवि सम्मेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. देशात भौगोलिक, सांस्कृतिक विविधता असतानाही सर्वांना एका सूत्रात बांधण्यासाठी कविता महत्वाची ठरते असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. आकाशवाणीच्या वतीनं मुंबईत पहिल्यांदाच हे समेलन होत असून देशभरातले २३ कवी आणि अनुवादक यात सहभागी झाले आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या

केंद्रावरून स्थानिक भाषांमध्ये २५ जानेवारी रोजी या कवितांचं प्रसारण होणार आहे.

<><><><>

उरण इथे काल झालेल्या बोट अपघाताचा तपास करण्यासाठी भारतीय नौदलाने विशेष चौकशी समितीची स्थापना केली आहे. गेटवे ऑफ इंडियावरून काल एलिफंटाला निघालेल्या बोटीला उरण इथे अपघात झाला आणि त्यात १३ जण मृत्युमुखी पडले. यात नौदलाशी निगडीत चौघे आणि बोटीतल्या ९ प्रवाशांचा समावेश आहे. नौदलाचे दोन कर्मचारी अद्यापही बेपत्ता असून त्यांचा शोध घेतला जात आहे. अपघातातल्या जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

<><><><>

संपूर्ण राज्यात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली आहे. सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं साडेसात अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

<><><><>

महिला क्रिकेटमधे भारत आणि वेस्टइंडिज यांच्यातला तिसरा टी-ट्वेंटी सामना आज नवी मुंबईत डी वाय पाटील स्टेडिअमवर होत आहे. वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><>//